21 व्या शतकातील सामाजिक , राजकिय परिवर्तनवादी चळवळीतील मातंग समाजाचे योगदान : एक अभ्यास – विशेष संदर्भ मराठवाडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत

पीएच.डी (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर करण्यात येणा–या

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक :

दत्तात्रय जनार्धन चव्हाण

(एम.ए.राज्यशास्त्र, एम.फिल.(अॅपिअर) नेट)

मार्गदर्शक :

डॉ.संतोष गुणवंतराव पाटील

संशोधक मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

दयानंद महाविद्यालय,लातूर

2019

प्रस्तावना :

21 व्या शतकातील सामाजिक , राजकिय परिवर्तनवादी चळवळीतील मातंग समाजाचे योगदान हा माÖया जिव्हाळयाचा अभ्यास विषय आहे.लातूर जिल्हयातील लातूर पासून आवघ्या सात कि.मी. अंतरावर पाखरसांगवी हे माझे गाव व मांग समाजाची जवळीकता माÖया जन्मापासून आहे.लातूर शहरापासून हाकेच्या अंतरावर माझे गाव अस्न सुध्दा मांग समाजाचे शिक्षणातील मागासलेपण,बेकारी, दारिद्र्य,निरक्षरता,गरिबी, गुलामगिरी, उपासमारी यासारख्या असंख्य समस्या आज 21 व्या शतकात सुध्दा माÖया गावातील मातंग समाज बांधवांशी चिकटुन आहेत. त्याचप्रमाणे मराठवाडयातील मातंग समाजाची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. राजकारणात जावून सामाजिक, राजकीय सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग उपलब्ध असला आणि अलिकडच्या काळात राजकारणातील मातंग समाजाचा सहभाग वाढला असला तरी तो निश्चितच अत्यंत अल्प आहे. आणि म्हणूनच मातंग समाजाचा मराठवाडयातील सामाजिक,राजकीय परिवर्तन चळवळीमध्ये त्यांच्या संख्येच्या प्रमाणात कितपत सहभाग आहे व किती असायला पाहिजे तसेच त्याचे प्रमाण वाढवता येईल का या संबंधीचा आढावा प्रस्तुत अभ्यास विषयात घ्यावयाचा आहे.

संशोधन विषयाची निवड :

सामाजिक, राजकीय परिवर्तनवादी चळवळीत मातंग समाजाचा सहभाग वाढवून विकास प्रकियेत उपयुक्त किंवा दिशादर्शक ठरतील अशा काही उपाययोजना शोधता येतील का? या प्रश्नांचे समाधानकारक विवेचन करता यावे यासाठी या अभ्यास विषयाची निवड केली आहे. आज 21 व्या शतकातही लातूर जिल्हा आणि एकूणच मराठवाडयातील मातंग समाजाच्या विकासाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, अनुसुचित जातीतील इतर समाजाच्या तुलनेत संख्येच्या प्रमाणात आज 21 व्या शतकातही मातंग समाज समुह मागासलेला दारिद्रयात खितपत पडलेला बेकारी, निरक्षरता, गरिबी, गुलामगिरी या सारख्या असंख्य समस्यांनी गुरफटलेला आहे.अनेक सोयी सुविधांच्या लाभापासून वंचितच आहे. राजकीय सत्तेचा वाटा संख्येच्या प्रमाणात त्यांच्यापर्यंत पोहोचलेलाच नाही.किंवा त्यांना राजकीय प्रकियेत सामावून घेतले गेले नाही.मातंग समाजातील मोजक्याच हाताच्या बोटावर मोजण्या इतक्याच व्यक्ती वगळता सामाजिक व

राजकीय उदासिनता आजही मोठया प्रमाणात असल्याचे आढळून येते. हीच उदासिनता समाजाच्या विकासाच्या हिताच्यादृष्टीने हानिकारक ठरताना दिसते आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून ते आजपर्यंत मातंग समाजाची झालेली प्रगती संपूर्ण मागासवर्गीय दलित समाजाचे या समाजाचे स्थिती/स्थान लक्षात घेता अनुसुचित जाती समुहातील इतर जातींच्या तुलनेत मातंग समाज अविकसित,अप्रगत राहिला आहे. म्हणून अनुसुचित जाती समुहातील इतर जाती समुहाप्रमाणे विकासाची प्रकिया विस्तारित होवून विकास प्रकिया गतिमान होण्यासाठी काय उपाययोजना करता येतील हे अनुभवजन्य पातळीवर तपासण्याच्या हेतूने प्रस्तुत अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधन अभ्यासाचे महत्व :–

लातूर जिल्हयातील आणि मराठवाडयातील अनुसुचित जाती समुहामध्ये महार, मांग, चांभार, ढोर अशा 59 जाती समुहापैकी 21 व्या शतकापर्यंतच्या विकास प्रकियेचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते की विकासाच्या वेगवेगळया स्तरावर मांग जात अनुसुचित जाती समुहातील वरील विविध जातींच्या तुलनेत मागासलेले व अनेक सोयी सुविधांपासून वंचित राहिलेली आहे. त्यामुळे एकंदरीत अनुसुचित जाती समुहातील या जातीची स्थिती/स्थान काय आहे हे पाहणे, अनुसुचित जाती समुहातील काही जाती प्रगत झाल्या आणि काही अप्रगत राहिल्या आहेत. म्हणून प्रगत समाजाप्रमाणे अप्रगत जातीकडे विकासाची प्रकिया विकासाची मुल्ये विस्तारित होवुन अनुसुचित जाती समुहात विकासाच्या बाबतीत समानता कशी येईल तसेच राजकिय सहभागातील उदासिनता कमी करण्याचा हेतू या या संशोधन कार्याचा आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :–

1. लातूर जिल्हयातील आणि एकूणच मराठवाडयातील मांग समाजाची राजकारणाविषयीची निष्क्रियता कमी करून राजकारणातील सहभाग वाढवणे.
2. शासनाच्या अनुसुचित जाती समुहासाठी असणा–या विविध सोयी सवलती उपभोग करून घेण्यासाठी प्रवृत्त करणे.
3. सामाजीक, शैक्षणिक, राजकीय,धार्मिक क्षेत्रातील त्यांच्या विकासाचे सुक्ष्म पध्दतीने संशोधन करणे.
4. मांग जातीच्या मागासलेपणाची कारणे शोधणे.

5. मराठवाडयातील सामाजिक परिवर्तनातील मांग समाजाच्या यागदानाचा आढावा घेणे.
6. मराठवाडयातील राजकिय परिवर्तनातील मांग समाजाच्या योगदानाचे प्रमाण शोधणे.
7. दलित परिवर्तन चळवळीतील सहभाग व त्यांचा दृष्टीकोन जाणून घेणे.
8. मातंग समाजातील चळवळीचा आढावा घेणे.
9. मातंग समाजातील युवकांची भुमिका व दृष्टीकोन जाणून घेणे.
10. आरक्षणाचा उपभोग कितपत झाला आणि कितपत होणे अपेक्षित होते याचा आढावा घेणे.
11. आरक्षणांतर्गत मांग समाजासाठी स्वतंत्र आरक्षण मिळाल्यास मसाजाचा विकास साधेल.हे तपासणे.
12. 21 व्या शतकातील सामाजिक परिस्थिती आणि राजकारण या विषयी मांग समाजाची मानसिकता तपासणे.

वरिल उद्दिष्टये डोळया समोर ठेवून मराठवाडयातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका विधानसभा निवडणुकित मातंग समाज व राजकारणातील सहभाग जाणून घेण्यासाठी हे अभ्यासक्षेत्र निवडण्यात आले आहे.

संशोधन अभ्यासाचे क्षेत्र :

या संशोधन कार्याचे क्षेत्र मराठवाडा हे निवडण्यात आले आहे. बहुसंख्य मातंग समुदायाचे लोक महाराष्ट्रा विविध जिल्हयात पारंपारिक व्यासाय शेतात सगळीकडे नोकरी शिक्षणाच्या निमित्ताने स्थायिक झालेले आहेत. त्यामुळे अभ्यासासाठी उपयुक्त असा स्तरीकृत नमुना मराठवाडयातील विविध जिल्हयाच्या ग्रामीण व शहरी भागातून मिळू शकतो.

मराठवाडा आणि मराठवाडयातील लातूर,नांदेड,औरंगाबाद,पूणे इ ठिकाणी शैक्षणिक ही शैक्षणिक राजकीय दृष्टीने अतिशय महत्वाची ठिकाणे आहेत. तेथील मातंग समाजाचे सुशिक्षित युवक,युवती,कार्यकर्ते,पदाधिकारी, शिक्षक, पाध्यापक यांच्याकडून प्रश्नावलीच्या व मुलाखतीच्या माध्यमातून माहिती मिळवून त्यांचे विश्लेषण येथे केले जाणार आहे.

संशोधनाची गृहितके :

1. मांग जात अनुसुचित जाती समुहातील इतर जाती समुहाच्या तुलनेत विकासाच्या विविध स्तरावर मागे आहे. तसेच त्यांचे राजकारणातील सहभागाचे प्रमाणणी कमी आहे. त्यांचे राजकिय सहभागीत्व वाढावे यासाठी या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला आहे.
2. शासनाने अनुसुचित जाती समुहासाठी दिलेल्य विविध सोयी सवलती या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या ठरलेल्या आहेत. पण त्यांचा लाभ घेण्यास मातंग समाज खुपच मागे राहिलेला आहे. .
3. राजकीय आणि संघटणात्मक दृष्टीने या समाजाचे अज्ञान आजही टिकून आहे. सार्वजनिक नेतृत्वाचा स्विकार केला जात नाही. अण्णाभाउ साठे महामंडळाचे मातंग समाजाच्या विकासातील अपयश स्वतंत्र आरक्षणाची मागणी व गरज स्थानिक राजकारणाविषयीची रूची वाढविणे सामाजीक भेदभावामुळे मातंग समाज हजारो वर्षापासून ज्ञान, सत्ता, संपत्ती व संधी पासून वंचित राहिला. मातंग समाज आजही संख्येच्या प्रमाणात अज्ञान आणि अंधःकाराच्या गर्तेत बुडालेला असल्यामुळे त्यांना आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव नाही.
4. लोकशाही मुल्यावर विश्वास ठवणा—या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विषम समाजरचनेत समता प्रस्थापित करण्यासाठी समाजातील दुर्बल घटकांना राज्यव्यवस्थेतील प्रतिनिधीत्व हा खरा समानतेचा हक्क मानला परंतू आजही मातंग समाजाचे राज्यव्यवस्थेतील प्रतिनिधीत्व अल्प दिसते.
5. ज्या भारतीय संविधानाला आपण प्रमाण माणून या देशाचा राज्यकारभार चालतो त्याच भारतीय संविधानाने आरक्षणाचे महत्व आणि उद्देश स्पष्ट कें ले आहेत. तरीही मातंग समाजाच्या मुक्तीचा मार्ग अजुनही खुला झालेला नाही. उपेक्षीतांच्या यादीत मातंग समाजाचा कमांक सर्वात वरचा लागतो.
6. मागासवर्गीयांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे मागासवर्गीय कल्याण योजने अंतर्गत कोटयावधींचा खर्च केला गेला मात्र मातंग समाज घटकाला त्याचा लाभ मिळू शकला नाही ही वस्तूस्थिती आहे.या महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधणे.
7. मातंग समाजाची सामाजिक आस्मिता जागृत व्हावी आणि मातंग समाजाच्या भवितव्याचा प्रश्न सुटावा म्हणून मातंग समाजाला सजग व जागृत करणे. इ.

संशोधनाची ग्रहितकृत्ये आहेत. हि गृहित कार्ये संशोधनातून पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधन आराखडा :–

संबधीत विषयाचे संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक क्षेत्र आढावा पध्दतीचे असून क्षेत्र आढावा प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, अनुसुची, चौकशी करून माहिती मिळवून सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत :–

संशोधनासाठी आवश्यक असलेले तथ्य हे प्राथमिक स्त्रोत यासोबतच दुय्यम स्त्रोत या मार्फत संकलित करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :–

संशोधनासाठी आवश्यक असलेली महत्वाची माहिती ही संबंधीत उत्तर दात्याकडुन प्रत्यक्ष मुलाखत प्रश्नावली निरीक्षण, अनुसुची इ.माध्यमातून मिळविण्यात येणार आहे. मराठवाडयातील सामाजिक कार्यकर्ते, राजकारणातील पुढारी युवक विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक इ. कडून मिळालेल्या माहितीची मदत येथे घेतली जाणार आहे.

दुय्यम स्त्रोत :–

विविध लेख, प्रबंध, संदर्भ ग्रंथ प्रकाशित व अप्रकाशित लेख, दैनंदिन वृत्तपत्रे, इंटरनेट इ पासून जमा केलेली तथ्य ही द्वितीय स्त्रोत होय.

संशोधन विषयाची निवड :–

संशोधनासाठी नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. मांग समाजाचा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था शहरी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महाराष्ट्र विधानसभेत राजकारणातील सहभागीत्वाचा अभ्यास करण्यासाठी या समाजाचे पाच गटात वर्गीकरण करण्यात येणार आहे. 1. कर्मचारो 2. पारंपारिक व्यवसायिक 3.विद्यार्थी युवक 4.महिला 5. सामाजिक व राजकिय कार्यकर्ते हे पाचही गट एक दुस–याा गटापेक्षा वेगळे आहेत. कारण त्यांची प्रत्येकाची स्वतःची अशी वेगवेगळी गुणवैशिष्टये आहेत. अशा सर्व लोकांना जिल्हा तालुका व काही ठराविक खेडयातील लोकांना भेटुन नमुना निवड पध्दतीने माहिती जमा केली जाणार आहे.

संशोधनाचा कालावधी :

प्रस्तुत संशोधन समस्येच्या अध्ययनासाठी 21 वे शतक म्हणजेच 2001 ते आजतागायत संशोधनाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

संशोधनाची मर्यादा :

उत्तरदात्यांनी प्रश्नासंबंधी केलेली विधाने संपूर्ण बरोबर असतीलच असे नाही. तसेच या विषयाच्या संबंधी मोजकेच साहित्य प्रकाशित झालेले असल्यामुळे संशोधनास मर्यादा येतात.म्हणून निश्चित निष्कर्षापर्यंत येण्यासाठी आणि परिपूर्ण अभ्यासासाठी ''21 व्या शतकातील सामाजिक , राजकिय परिवर्तनवादी चळवळीतील मातंग समाजाचे योगदान'' : एक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा एवढया पुरताच सदरील शोध प्रबंध मर्यादीत राहील.

प्रकरणांची रूपरेषा :–

प्रकरण पहिले : प्रस्तावना : ''21 व्या शतकातील सामाजिक , राजकिय परिवर्तनवादी चळवळीतील मातंग समाजाचे योगदान : एक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा या शोध प्रबंधाचा अभ्यास प्रस्तावनेसह एकूण सात प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : सामाजीक व राजकिय परिवर्तन

अ.)सामाजिक परिवर्तन :

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या संरचनेत बदल घडविणारी प्रकिया होय. सामाजिक परिवर्तनाद्वारा मानवाचे रितीरिवाज, आचार विचार, संस्था, संघटना जीवनपध्दती सभोवतालचा परिसर व्यक्तिव्यक्तिमधील परस्पर संबंध यात देखील सतत बदल होत असतात. त्यादृष्टीने मातंग समाजाच्या सामाजिक परिवर्तनाचा समाजाच्या परस्पर संबंधाच्या स्वरूपात झालेल्या बदलाचा अभ्यास येथे केला जाणार आहे.

ब)राजकिय परिवर्तन :

आधुनिक राज्यशास्त्रात राजकिय परिवर्तन ही एक अत्यंत महत्वाची संकल्पना मानली जाते.राजकारण ही एक गतिशिल प्रकिया असल्यामुळे प्रत्येक देशाच्या

राजकारणात काही महत्वपूर्ण बदल/परिवर्तन नेहमीच घडून येत असते. मानवाच्या आजवरच्या ऐतिहासीक वाटचालीचा विकास पाहिला असता त्यामध्ये सातत्यान मोठया प्रमाणावर परिवर्तन होत असल्याचे आपल्या लक्षात येते. निवडणुकीच्या मार्गाने राज्यातील मतदार अधिकाररूढ राजकिय पक्षाचे सरकार पदच्युत करतात आणि त्या जागी दुस—या एखाद्या पक्षाच्या सरकारची स्थापना केली जाते. एखाद्या सरकारातील काही मंत्री राजीनामा देतात तर काही मंत्र्यांना कधी कधी पदच्युत केले जाते.देशाच्या राजकिय जिवनात होत असलेल्या अशा बदलांची कितीतरी उदाहरणे आपणास सांगता येतात. त्यादृष्टीकोनातून मातंग समाजात होत असलेल्या राजकिय परिवर्तनाचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. यासाठी मातंग समाजातील राजकारणात सक्रिय असणा—या काही राजकिय नेते व कार्यकर्त्यांच्या कार्याचा आढावा येथे घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे : मराठवाडा एक ओळख

मराठवाडयात औरंगाबाद, उस्मानाबाद,लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, बीड, जालना या आठ जिल्हयांचा समावेश होतो. औरंगाबाद शहर हे या विभागाचे मुख्यालय आहे. महाराष्ट्रातील 16.84% लोकसंख्या या प्रदेशात राहते.त्यापैकी 30% लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. मरावाडयातील जिल्हावाईज मातंग समाजाची लोकसंख्या त्यांचे साक्षरतेचे प्रमाण, प्रमुख व्यवसाय उपजिवीकेची साधने शेतीवर अवलंबून असणा—या कुटूंबाची संख्या इ.प्रश्नांची उकल येथे करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : मातंग समाजाचा इतिहास

मातंग समाज अतिशय पुरातन काळापासून अस्तित्वात असून या समाजात अनेक थोर ऋषीमुनी,योगीपुरूष व महान असे विचारवंत होवून गेले. मातंग समाज प्रगल्भ विदवत्ताधारक होता.जप,तप,साधना, सत्वशिलवृत्ती तसेच धैर्य, शौर्य या विशेष गुणांनी संपन्न होता.समृध्द गुरूकुलाची परंपरा असलेला मातंग समाज शुद्र अतिशुद्र वर्गात कसा गेला.? त्याला वाळीत कोणी टाकले ? याचे चिंतन येथे केले जाणार आहे.

श्रीकृष्णाचे गुरू मातंग ऋषी सांदीपानी यांच्या कार्याचा, क्रांतीपिता लहुजी राघोजी साळवे मुक्ता साळवे, साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व इतर आदर्शवत

असलेल्या समाजसुधारकांच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा येथे घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे : मराठवाडयातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीत मातंग समाजाचे योगदान

मातंग समाजातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीत कार्य करणा—या समाजसुधारकांच्या समाजसुधारणेच्या दृष्टीकोनातून असणा—या योगदानाचा आढावा येथे घेतला जाणार आहे. त्यामध्ये मातंग संघर्ष समिती, आखिल भारतीय मातंग संघ, मातंग एकता आंदोलन, मानवीहक्क अभियान, दलित महासंघ लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ, अण्णाभाऊ साठे फाउंडेशन महाराष्ट्र मातंग विकास महामंडळ लहुजी सेना इ.च्या कार्याचा मातंग समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अभ्यास येथे केला जाणार आहे.

प्रकरण सहावे : मराठवाडयातील राजकिय परिवर्तनवादी चळवळीत मातंग समाजाचे योगदान

मातंग समाजातील राजकिय परिवर्तनवादी चळवळीत कार्य करणा—या राजकिय नेते पुढारी कार्यकर्ते इ.च्या कार्याचा मातंग समाजाच्या राजकिय परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून असणा—या त्यांच्या योगदानाचा आढावा येथे घेतला जाणार आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारस

21 व्या शतकाचे दुसरे दशक चालू असताना आपण भारतीय जातीव्यवस्थमध्ये मातंग समाज या नावाने ओळखल्या जाणा—या एका जातीसमुहाचा स्वतंत्र विचार करीत आहोत. हा विचार यामुळे करावा लागत आहे की, स्वातंत्र्य मिळून 70 वर्षे होत असताना हा समाज कुठे आहे ? कसा आहे ? प्रगतीच्या टप्प्यावर आहे कि अधोगतीच्या ? याचा स्वतंत्रपणे आणि निरपेक्षपध्दतीने विचार करावा लागणार आहे.

संशोधक मार्गदर्शक — संशोधक

प्रा.डॉ.संतोष गुणवंतराव पाटील — दत्तात्रय जनार्धन चव्हाण

संशोधक मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

दयानंद महाविद्यालय,लातूर

: